# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/भूविभाग/E 36788 दिनांक : 31/12/2018

## परिपत्रक

**विषय : महामंडळाच्या "क" , "ड" आणि "ड+" विभागातील औद्योगिक क्षेत्रामध्ये उद्योगांना भूखंड वाटपात प्राधान्य देणेबाबत..**

**संदर्भ :- १.मऔविम/भूविभाग/कार्यासन-१/३३२२/२०१२ दिनांक १९.१२.२०१२**
**२.मऔविम/भूविभाग/म.व्य(भूमी)/बी-६५६४० दि. ०९.०५.२०१७**

महामंडळाच्या दिनांक ०९.०५.२०१७ च्या परिपत्रकानुसार ज्या उद्योजकांची प्रकल्पामधील गुंतवणूक १०० कोटीपेक्षा जास्त आहे, आणि कमीत कमी १० एकर भूखंडाची आवश्यकता आहे, अशा उद्योजकांचा प्राधान्य सदराखाली भूखंड वाटपासाठी समावेश करण्यात आलेले आहे. राज्यातील औद्योगिकदृष्टया अविकसित क्षेत्रातील छोटया उद्योजकांना,तसेच शेतकरी कंपन्यांना प्रोत्साहन देण्याकरीता तसेच त्यांच्या त्यांच्या उत्पादनाचा दर्जा वाढवून त्यांना अधिक स्पर्धात्मक बनविण्यासाठी, तसेच राज्याच्या अविकसीत भागामध्ये १०० कोटी गुंतवणूक करणे शक्य नसल्याने गुंतवणूकीची मर्यादा कमी करणे बाबत उद्योजकांकडून, शेतकरी उत्पादन कंपन्या, लोकप्रतिनिधी यांच्याकडून मागणी होत असल्याने सदर परिपत्रात सुधारणा करुन, अशा उद्योजकांना व शेतकरी उत्पादक कंपन्याना देखील भूखंड वाटपामध्ये प्राधान्य देऊन अशा भूखंडाच्या विकासाकरीता जे धोरण प्राधान्य सदराखाली वाटप केलेल्या भूखंडांना लागू आहे तेच धोरण या भूखंडांना लागू करणे बाबतचा विषय संचालक मंडळाच्या दिनांक ३१.१०.२०१८ रोजी झालेल्या ३७६ व्या बैठकीत चर्चा होवून ठराव क्र. ५७९५ पारीत करण्यात आला. सदरहू ठरावाच्या अनुषंगाने, महामंडळाने निर्गमित केलेले दिनांक ०९.०५.२०१७ चे परिपत्रक रद्द करुन खालीलप्रमाणे सुधारित परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

१) खालील उदयोजकांचा प्राधान्य सदराखाली भूखंड वाटपासाठी समावेश करण्यात यावा.

अ) महामंडळाच्या विदर्भ, मराठवाडा, कोकण विभाग (केवळ रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हे), उत्तर महाराष्ट्र (नाशिक महानगर क्षेत्रविकास प्राधिकरणचे क्षेत्र(NMRDA) वगळून) विभागातील "ड" आणि "ड +"औद्योगिक क्षेत्रांतील ज्या उद्योजकांच्या प्रकल्पामधील एकूण गुंतवणूक किमान रु. २० कोटी आहे व ज्या शेतकरी उत्पादक कंपनीची गुंतवणूक किमान रु. १० कोटी आहे.

ब) महामंडळाच्या विदर्भ, मराठवाडा, कोकण विभाग (केवळ रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हे), उत्तर महाराष्ट्र (नाशिक महानगर क्षेत्रविकास प्राधिकरणचे क्षेत्र(NMRDA) वगळून) विभागातील

"क" औद्योगिक क्षेत्रांतील, ज्या उद्योजकांच्या प्रकल्पामधील एकूण गुंतवणूक किमान रु. ५० कोटी आहे व ज्या शेतकरी उत्पादक कंपनीची गुंतवणूक किमान रु. २० कोटी आहे.

क) वरीलप्रमाणे मुद्या क्र. "अ" व "ब" मध्ये नमूद विभागांव्यतिरिक्त इतर विभागातील महामंडळाच्या "क" विभागातील(पीएमआर क्षेत्र आणि एमएमआर क्षेत्र वगळून) औद्योगिक क्षेत्रांतील ज्या उद्योजकांच्या प्रकल्पामधील एकूण गुंतवणूक किमान रु. १०० कोटी आहे, अशा उद्योजकांना प्राधान्य सदराखाली भूखंड वाटपासाठी समावेश करण्यात येत आहे.

ड) वरीलप्रमाणे "अ" व "ब" मध्ये नमूद विभागांव्यतिरिक्त इतर विभागातील महामंडळाच्या "ड" आणि "ड +" विभागातील (पीएमआर क्षेत्र आणि एमएमआर क्षेत्र वगळून) औद्योगिक क्षेत्रात, ज्या उद्योजकांच्या प्रकल्पामधील एकूण गुंतवणूक किमान रु. ५० कोटी आहे, अशा उद्योजकांना प्राधान्य सदराखाली भूखंड वाटपासाठी समावेश करण्यात येत आहे.

२) उद्योजकांच्या प्रकल्पामधील गुंतवणूकीबाबत तांत्रिक सल्लागार यांचे अभिप्राय घेवून त्यानुसार क्षेत्र वाटपाबाबत भूखंड वाटप समितीने निर्णय घेण्यात यावा.

३) उपरोक्त प्रमाणे उद्योजकांना वितरित केल्या जाणा-या भूखंडांच्या विकासाकरीता दि. २२.०१.२०१३ तसेच दि. ०३.११.२०१७ च्या परिपत्रकामधील धोरण लागू राहील.

सदरहू धोरण या परिपत्रकाचे दिनांकापासून लागू राहिल. सर्व संबंधितांनी सदर सुधारित धोरणाची नोंद घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(अण्णासाहेब मिसाळ)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन)**
**मऔविम, मुंबई.**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई